# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**गोवळकोटचा किल्ला (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) पर्यटन विकास केंद्र म्हणून विकसीत करण्याबाबत**

**(१) ६९८१२ (२७-०१-२०१७). श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवळकोट किल्ला (ता.चिपळूण,जि.रत्नागिरी) सुशोभिकरण परशुराम ते किल्ला रोपवे प्रस्ताव गोवळकोट धक्का ते दाभोळ खाडीपर्यंत जलपर्यटन आणि क्रोकोडाईल सफरी आदी कामे हाती घेवून पर्यटन विकास करण्याची घोषणा करून गोवळकोटचा पर्यटन विकास करण्यात येईल अशी मा.पालकमंत्री यांनी २ वर्षापूर्वी घोषणा करूनही आतापर्यंत गोवळकोटचा पर्यटन विकास करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणतीही योजना राबविली नाही, हे खरे आहे काय

(२) असल्यास, गोवळकोटचा पर्यटन विकास करण्याच्या दृष्टीने अद्यापर्यंत कामे सुरु केली नसल्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदरहू गोवळकोट पर्यटन विकास केंद्र म्हणून विकसीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०१-१०-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही. रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील गोवळकोट किल्ल्याच्या पर्यटन विषयक विकास कामांसाठी सन २०१०-२०११ मध्ये १२ व्या वित्त आयोगांतर्गत शौचालय, पर्यटकांना बसण्याची व्यवस्था, नदीशेजारी रस्त्यावर फर्निचर,बोटीसाठी जेट्टीचे बांधकाम व नगर परिषदेच्या जॅकवेलशेजारी जेटी उभारण्याची कामे पूर्ण करण्यात आलेली असून गोवळकोट धक्का व किल्ल्याच्या सुशोभिकरणासाठी एकूण रू.१०९.९७ लक्ष निधी उपलब्ध करुन दिलेला असून सदर कामे प्रगतीत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबईतील गवळीदेव, मुंबादेवी व सुलाईदेवी स्थळे पर्यटनस्थळे म्हणून घोषित करणेबाबत**

**(२) ७५४५२ (१४-०४-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई परिसरातील गवळीदेव, मुंबादेवी व सुलाईदेवी ही निसर्गरम्य स्थळे पर्यटनाच्या दृष्टीने आकर्षक असल्याने त्याचा समावेश पर्यटन स्थळांमध्ये करण्याबाबत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तिन्ही स्थळे अतिशय रम्य व डोंगरामध्ये वसलेली असल्याने टी पर्यटकांना आकर्षित करणारी असूनही याची अद्यापि त्यांचा समावेश पर्यटन स्थळामध्ये करण्यात आलेला नसल्यामुळे पर्यटक नवी मुंबईकडे आकर्षित झालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदरची तिन्ही स्थळे पर्यटन स्थळे म्हणून घोषित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०४-१०-२०१८) :** (१) नाही.

(२), (३) व (४) गवळीदेव,मुंबादेवी व सुलाईदेवी स्थळांच्या विकासाबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांनी आयुक्त,नवी मुंबई महानगरपालिका यांना माहिती सादर करण्याचे कळविले आहे. त्यानुसार प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ठेवण्यात येणार आहे.

---

**पन्हाळगड ते विशाळगड (जि.कोल्हापूर) मार्गावरील शिवकालीन विहिरींची झालेली दुरवस्था**

**(३) ७६४७० (१९-०४-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पन्हाळगड ते विशालगड (जि.कोल्हापूर) या मार्गावरील बांधलेल्या या वाटेवरती बांधलेल्या विहिरी विकासापासून वंचित राहिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर विहिरींचा विकास करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०१-१०-२०१८) :** (१) जिल्हाधिकारी,कोल्हापूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार अशी कोणतीही विहिर शासनाच्या विभागाकडे नोंद नाही किवा देखभाल दुरुस्तीकरिता नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात किल्ल्यांच्या जवळील शासकीय जमिनीवर पर्यटकांसाठी हॉटेल व अन्य सुविधा उपलब्ध करण्याबाबत**

**(४) ८०८१२ (१८-०४-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जास्तीत जास्त पर्यटक यावेत यासाठी आगामी वर्षभरात विविध उपक्रम राबविले जाणार असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अंदाजे ४५० किल्ले पुरातत्व खात्याकडे असुन या किल्ल्यांच्या जवळ शासकीय जमिनी असल्याने पर्यटकांसाठी त्या ठिकाणी हॉटेल आणि अन्य सुविधा उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०४-१०-२०१८) :** (१) राज्यात जास्तीत जास्त पर्यटक यावेत यासाठी दरवर्षी विविध उपक्रम राबविले जातात.

(२) व (३) किल्ले परिसरात व पायथ्याशी पर्यटकांना सुविधा पुरविण्यासाठी प्रत्येक किल्ल्याच्या परिसरात/पायथ्याशी शासकीय जमीन उपलब्ध होण्यासाठी जिल्हाधिकारी, नाशिक/अहमदनगर/धुळे/अमरावती/उस्मानाबाद/बुलढाणा/कोल्हापूर/पुणे/सातारा/पालघर/रायगड/ नागपूर यांना विनंती करण्यात आली असून जमीन उपलब्धतेसाठीची कार्यवाही सुरु आहे.

---

**महाराष्ट्र पर्यटन महामंडळाच्या अनधिकृत बांधकामाबाबत**

**(५) ८१३६० (१९-०४-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईत असलेले महाराष्ट्र पर्यटन महामंडळाचे बेकायदा कार्यालय तात्काळ पाडण्याबाबत महानगरपालिकेने १५ दिवसांची मुदत दिली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासन तात्काळ महाराष्ट्र पर्यटन महामंडळाकरीता पर्यायी जागा उपलब्ध करून देणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०४-१०-२०१८) :** (१) होय.

(२) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या कार्यालयासाठी ए.पी.जे.हाऊस, ४ था मजला, चर्चगेट, मुंबई येथे भाड्याने जागा देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूरात येणा-या पर्यटकांना सुविधांपासून वंचित रहावे लागत असल्याबाबत**

**(६) ८४५८२ (१९-०४-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर आणि जिल्हयातील पर्यटन स्थळाकडे पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी सुविधा पुरविण्याचा संकल्प करण्यात आला असला तरी देशभरातून कोल्हापूरात येणा-या पर्यटकांना सुविधांपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर आणि जिल्हयातील पर्यटनस्थळांमध्ये पर्यटनवाढीसाठी व जिल्हा आर्थिक उन्नतीसाठी पर्यटकांना विशेष पॅकेज व नाविन्यपूर्ण योजना उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०१-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

कोल्हापूर आणि जिल्हयातील पर्यटन स्थळांकडे पर्यटकांना आकर्षित करण्याच्या उद्देशाने वाहतुकीच्या नियमनासाठी महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी फलक बसविण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे महालक्ष्मी मंदिराकडे व इतर ठिकाणांकरिता दिशादर्शक फलक आणि दिशादर्शक कमानी बसविण्यात आल्या आहेत.

(२) नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत शहरातील नागरीक व शहरात येणारे पर्यटक यांच्या सुरक्षिततेकरिता शहरातील विविध ठिकाणी कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत.

श्री क्षेत्र नृसिंहवाडी या तीर्थक्षेत्राच्या रू.६३.५० कोटीच्या विकास आराखड्यास मान्यता देऊन रू.५५.०० कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तसेच ज्योतिबा तीर्थक्षेत्राच्या रू.२५ कोटीच्या विकास आराखड्यास मान्यता दिलेली आहे.

शाहू महाराज जन्मस्थळ येथे वस्तुनिष्ठ संग्रहालय निर्माण करण्यासाठी पुरातत्व विभागास रू.२.१० कोटी निधी देण्यात आलेला आहे.

जिल्हा नियोजन समितीमार्फत पर्यटनासाठी सन २०१६-२०१७ मध्ये रू.४ कोटी व इको टुरिझमसाठी रू.२.५० कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

पन्हाळा येथे लाईट अँड साऊंड शोकरिता व वन विभागामार्फत इको टुरिझम अंतर्गत साहसी पर्यटनासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील देवबाग गावातील स्मशानभूमिची जमीन पर्यटन मंडळाने संपादित केल्याबाबत**

**(७) ८६०६७ (१२-०८-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील समुद्र तसेच खाडीतील पर्यटनासाठी प्रसिध्द असलेल्या देवबाग गावाचा पर्यटन विकास करतांना देवबाग गावातील एकमेव स्मशानभूमिची जमीन पर्यटन मंडळाने संपादित केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार सदर स्मशानभूमिसाठी पर्यायी जागा ग्रामस्थांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०४-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटन विकास व सुविधा उपलब्ध करण्यासाठीच्या आढावा बैठकीस संबंधित अधिकारी अनुपस्थित असल्याबाबत**

**(८) ८६४१२ (१९-०८-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटन विकास व सुविधा उपलब्ध करण्यासाठी शासनाकडून देण्यात येणा-या निधीचा योग्य वापर करण्यात येतो की नाही याचा आढावा घेण्यासाठी दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी मा.पर्यटन मंत्री, पालकमंत्री व मुख्यकार्यकारी अधिकारी तसेच कार्यकारी अभियंता, उपजिल्हाधिकारी यांनी घेतलेल्या आढावा बैठकीस संबंधित अधिकारी उपस्थित नव्हते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार बैठकीस अनुपस्थीत राहणा-या संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०४-१०-२०१८) :** (१) सदर बैठकीस जिल्हा नियोजन अधिकारी उपस्थित होते. इतर कार्यान्वयीन यंत्रणेचे अधिकारी अनुपस्थित होते.
(२) अनुपस्थित अधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्यामार्फत त्यांच्या गैरहजेरीबद्दल समज देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरात हॉटेल मॅनेजमेंट व केटरिंग कॉलेजच्या इमारतीमध्ये मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(९) ८८०४३ (१२-०८-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभाग व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे सोलापूर शहरात हॉटेल मॅनेजमेंट व केटरिंग कॉलेजच्या इमारतीचे ३ महिन्यापूर्वी उद्घाटन होऊन अद्यापही त्या इमारतीमध्ये लाईट, पाण्याचा पुरवठा झालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय ,
(३) असल्यास,चौकशीनुसार हॉटेल मॅनेजमेंट व केटरिंग कॉलेजच्या इमारतीमध्ये मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०४-१०-२०१८) :** (१), (२), (३) व (४) कॉलेजच्या इमारतीमध्ये विद्युत व पाण्याचा पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. प्रशासकीय आणि शैक्षणिक इमारत, मुलींचे वसतीगृह, कर्मचारी निवास,संलग्न सेवा,विद्युतीकरण,मुख्य दरवाजा,मुख्य सेवा रस्ता, रस्ता, सुरक्षा केबीन,पाण्याची टाकी इ.,एस.आर.पाईपलाईन,हायड्रन्ट सिस्टीम,पंप व ॲक्सेसरीज,बाह्य पाणी पुरवठा पंप, रोहित्र उपकेंद्राची उभारणी,महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी लि. वीजपुरवठा कोटेशन व संलग्न विद्युत कामे, मुख्य इमारतीच्या अनुषंगाने कामे पूर्ण झाली आहेत. प्रशासकीय इमारतीत संरक्षक भिंत, रेन वॉटर हार्वेस्टिंग, ड्रेनेज, पदपथ, आग प्रतिबंधक यंत्रणा बसविणे इत्यादी कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

तसेच पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दि.२१/२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रयोगशाळेसाठी साधनसामग्री, संगणक, वर्गासाठी फर्निचर यासाठी रू.४००.०० लक्ष निधी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

---

## कळमेश्वर (जि.नागपूर) तालुक्यातील तहसिल कार्यालयाच्या व पंचायत समितीच्या कार्यालयाच्या नविन इमारतीचे बांधकाम करण्याबाबत

**(१०) ९२३६५ (१९-०८-२०१७). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमेश्वर (जि.नागपूर) तालुक्यातील तहसिल कार्यालय व पंचायत समिती कार्यालयाकरीता दोन नविन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे अत्यंत आवश्यक झाले आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कळमेश्वर येथे असलेल्या कृषी माहिती केंद्राची इमारत व बचत भवन इमारत या दोन बाधीत इमारती निष्कासित करुन त्या ठिकाणी दोन नविन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करावयाचे असल्याने कृषी माहिती केंद्राची इमारत व बचत भवन इमारत या दोन बाधीत इमारती पाडण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक ९ जानेवारी, २०१२ मधील मुद्या क्र ८ नुसार ग्रामविकास विभागाने दिनांक ४ एप्रिल, २०१६ रोजीच्या पत्रानुसार संबधित विभागीय अधिक्षक सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांच्याकडून प्रमाणपत्र उपलब्ध करून दयावे अशी मागणी करणारे पत्र ग्रामविकास विभागाने दिनांक ४ एप्रिल,२०१६ रोजी मुख्य कार्यपालन

अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांना पाठविले असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार कळमेश्वर येथे असलेल्या कृषी माहिती केंद्राची इमारत व बचत भवन इमारत या दोन बाधीत इमारती निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-१०-२०१८) :** (१) कळमेश्वर तालुक्यातील तहसिल कार्यालय व पंचायत समिती कळमेश्वर कार्यालय या दोन्ही नवीन प्रशासकीय इमारतींचे बांधकाम पुर्ण झाले असून नवीन इमारतीत दैनंदीन कामकाज सुरळीतपणे सुरु आहे.

(२) हे खरे आहे.

(३) कळमेश्वर येथे असलेल्या कृषी माहिती केंद्राची इमारत व बचत भवन इमारत या दोन बाधीत इमारती जिल्हा परिषदेमार्फत पाडण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हयातील धापेवाडा व आदासा येथील विकास कामाकरीता उर्वरित निधी मिळण्याबाबत

**(११) ९२३६६ (१९-०८-२०१७). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाइको टुरिझम व पिलीग्रीमेज सेंटर अंतर्गत केंद्र शासन पर्यटन मंत्रालय नवी दिल्लीचे पत्र क्र पीएसडब्ल्यू/५३/२०११ दिनांक २८ जून, २०१३ अन्वये नागपूर जिल्हयातील धापेवाडा येथील विकास कामाकरीता ५३४.३३ व आदासा येथील विकास कामाकरीता ८६.०० लक्ष करीता प्रशाकीय मान्यता मिळालेली आहे या आदेशान्वये कामाला सुरवात सुध्दा झाली असून काही कामे पुर्णत्वात आली असून त्यावर २५४.९९ लक्ष रूपये खर्च झाले आहे, परंतू अनेक कामे अपूर्ण असून ती कामे पुर्ण करण्याकरीता १४५.३९ लक्ष रूपयांच्या निधीची आवश्यकता असून त्याबाबत कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नागपूर यांनी व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मुंबई यांच्याकडे दिनांक २४ मे, २०१७ रोजी पत्राद्वारे मागणी केली आहे मात्र अद्यापही सदर निधी वितरित करण्यात आला नसल्याची माहिती माहे दिनांक २८ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल : (०४-१०-२०१८) :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांच्या दि.२१/६/२०१७ च्या पत्रान्वये मागणी केल्यानुसार महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने दिनांक १३/९/२०१७ रोजी रू.३६५.३४ लक्ष सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केलेले आहेत.

---

**खल्याळ गव्हाण (ता.देऊळगाव राजा, जि.बुलढाणा) येथे नवीन शेत रस्ता तयार करण्याबाबत**

**(१२) ९३२८८ (२१-०८-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकपूर्णा धरणामुळे खल्याळ गव्हाण (ता.देऊळगाव राजा, जि.बुलढाणा) येथील जुने रस्ते पाण्याखाली गेल्यामुळे शेतकऱ्यांना शेती करण्यास अडचणी येत असल्याने खल्याळ गव्हाण येथील खडकपूर्णा प्रकल्पामुळे बाधित झालेल्या जुन्या रस्त्यास पर्यायी शेत रस्ता म्हणून डोबी नाल्याच्याकडेने नवीन रस्त्यावरील पुलापासून पूर्वेकडे जुन्या रस्त्यापर्यत नवीन शेत रस्ता तयार करुन मिळण्याबाबतची मागणी शेतकऱ्यांनी संबंधित विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) अअसल्यास, सदर मागणीनुसार शेतक-यांना नवीन शेत रस्ता तयार करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०१०-२०१८) :** (१) होय.

(२) सदर शेती पोच मार्ग पूर्व परंपरागत वहीवाटीचा नसून खाजगी शेत जमिनीमधून करण्याची मागणी आहे. शेतपोच रस्त्यासाठी पुनर्वसन अधिनियमाप्रमाणे भूसंपादनाची तरतूद नाही. जमीन मालकांकडून दानपत्रे प्राप्त न झाल्यामुळे रस्ता करता येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**लघु पाटबंधारे विभागाच्या गैरकारभाराबाबत**

**(१३) ९३७६६ (२१-०८-२०१७). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगाखेड (जि.परभणी) येथे शासनाचे लघु पाटबंधारे विभागामार्फत सन २०११ मध्ये मुळी बंधारा बांधण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंधाऱ्यावरील गेट न.१२ व गेट न.१३ हे गोदावरी पात्रात वाहून गेलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बंधाऱ्याची पाहणी शासनाने केली आहे काय,

(४) असल्यास, पाहणीनुसार बंधाऱ्याला नवीन गेट बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) बंधा-यावरील व्दाराचे घटक भाग बंधा-याच्या निम्न बाजूस उन्मळून पडले असून, मुख्य अभियंता (जसं) औरंगाबाद व अधिक्षक अभियंता, (व्दारे) , मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना, नाशिक यांनी बंधा-याची पाहणी करून स्वयंचलित व्दारे ऐवजी उभ्या उचल पध्दतीची व्दारे बसविण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यानुसार कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील मुळशी व मढेघाट, ताम्हणीघाट, वरंध घाट येथील धबधब्याच्या ठिकाणी जीवरक्षक नेमण्याबाबत**

**(१४) ९७९४६ (२६-१२-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील मुळशी व मढेघाट, ताम्हणीघाट, वरंध घाट येथे अनेक निसर्गरम्य धबधबे असून येथे पर्यटकांच्या हलगर्जीपणामुळे दरवर्षी पावसाळयात दुर्घटना घडत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दरवर्षी पावसाळयात सदर ठिकाणी पर्यटकांच्या सुरक्षेसाठी जीवरक्षक व पोलिस तैनात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०१-१०-२०१८) :** (१) अपर पोलीस अधीक्षक, पुणे विभाग,पुणे ग्रामीण यांच्या अहवालानुसार माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये मुळशी तालुक्यातील ताम्हणी घाट येथे २ पर्यटकांचा मृत्यू झालेला आहे.
(२) ताम्हणी घाट, वरंधा घाट, मढे घाट येथे पोलीस बंदोबस्त लावण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लघु पाटबंधारे तलाव जाधववाडी (ता.मावळ, जि.पुणे) या प्रकल्पातून खालुम्ब्रे, येलवाडी, इंदोरी, सांगुर्डी व कान्हेवाडी या गावांना प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातून वगळण्याबाबत**

**(१५) ९९२५३ (२६-१२-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लघु पाटबंधारे तलाव जाधववाडी (ता.मावळ, जि.पुणे) या प्रकल्पामध्ये डावा व उजवा अशा दोन कालव्यांची तरतूद केली होती परंतु सदर कालवे सन २००३ मध्ये रद्द करून सिंचन क्षेत्र उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी धरणाच्या खालच्या बाजूस चार कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे बांधण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,कालव्याशिवाय कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे बांधले तरी लाभक्षेत्रास सिंचनाचा फायदा मिळणार नसल्याचे मत म.कृ.खो.वि. महामंडळाने मांडल्यानंतर मा.मंत्री, जलसंपदा यांनी जाधववाडी प्रकल्पातून खालुम्ब्रे, येलवाडी, इंदोरी, सांगुर्डी व कान्हेवाडी या गावांना लाभ होत नसल्याने प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातून या गावांचे क्षेत्र वगळण्याचा ठराव म.कृ.खो.वि. महामंडळाच्या नियामक मंडळाच्या बैठकीत करून अंतिम मान्यतेसाठी शासनास सादर करावा अशा सूचना दिनांक ५ जुलै, २००८ रोजीच्या बैठकीत देण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(३) असल्यास,अधिक्षक अभियंता पुणे पाटबंधारे मंडळ यांनी दिनांक ७ जुलै, २००८ रोजी मा.जिल्हाधिकारी यांना पत्रान्वये सादर केलेल्या इतिवृत्ताच्या अनुषंगाने जाधववाडी प्रकल्पातून खालुम्ब्रे, येलवाडी, इंदोरी, सांगुर्डी व कान्हेवाडी या गावांना प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातून या गावांचे क्षेत्र वगळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची  कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१८) :** (१) व (२) होय.

(३) या अनुषंगाने मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१/५/२०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती, सदर बैठकीत प्रकल्पातील कालवे रद्द करताना कोल्हापुर पध्दतीच्या बंधा-याव्दारे पाणी उपलब्ध करुन लाभक्षेत्र कायम ठेवण्याचा निर्णय झाला असल्याने सद्य:स्थितीत लाभक्षेत्रातून गावे वगळता येणार नाही किंवा शेरे उठविता येणार नाही असे निर्देश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## असर्जन (जि.नांदेड) येथील विष्णुपूरी प्रकल्पाच्या दरवाजांची झालेली दुरवस्था

**(१६) ९९३६४ (२६-१२-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) असर्जन (जि.नांदेड) येथील विष्णुपूरी प्रकल्पाच्या एकूण १८ दरवाजांपैकी १० दरवाजे गेल्या अनेक वर्षापासून झिजून गेले असल्याने दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी यांत्रिकी मंडळाचे अधिक्षक अभियंता यांनी जलसंपदा विभाग व गोदावरी खोरे महामंडळाकडे सातत्याने मागणी करुनही निधी मिळत नसल्याने दापोडी पुणे येथील मागविलेले नवीन १० दरवाजे देखील बसविण्यात अडथळा निर्माण होत असल्याने दरवाजे वापराविना पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दरवाजाची पाहणी केली आहे काय व त्यानुसार विष्णुपूरी प्रकल्पाचे दरवाजे पावसाळयापूर्वी तातडीने बसविण्यासह सेवाद्वाराची निर्मिती उभारणी व अनुषंगिक कामासाठी लागणारा रु.४८५.६५ लक्ष निधीची पूर्तता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०८-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी सदर दरवाजांची पाहणी केली आहे. सदर कामे विष्णुपूरी पंचम सुधारीत प्रशासकीय सुप्रमा मध्ये समाविष्ट असून शासनाने दि.३/५/२०१८ रोजी सुप्रमास मंजूरी प्रदान केली आहे. सदर कामे सद्य:स्थितीत यांत्रिकी विभागाकडून प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### जव्हार (जि.पालघर) तालुक्याचा पर्यटनासाठी विकास करण्याबाबत

**(१७) १०००१२ (२६-१२-२०१७). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयातील जव्हार तालुका हे पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्याचा प्रस्ताव प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यासाठी अंदाजे किती खर्च येणार आहे व त्याठिकाणी कोणत्या सोयी उपलब्ध करुन देण्यात येतील तसेच त्यासाठी किती रकमेची तरतूद करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०४-१०-२०१८) :** (१), (२) व (३) पालघर जिल्हयातील जव्हार हे स्थळ अविभाजित ठाणे जिल्हयाच्या जिल्हा नियोजन समितीच्या दि.१०/८/२००० च्या बैठकीत पर्यटन स्थळ म्हणून घोषित करण्यात आले आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार सन २०१५-२०१६ पासून जव्हार तालुक्यातील कामांसाठी रूपये २२५.९६ लक्ष उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

---

### श्री क्षेत्र मार्लेश्वर (जि.रत्नागिरी) येथील देवरुख ते मार्लेश्वर या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(१८) १०२०३० (२६-१२-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री क्षेत्र मार्लेश्वर (जि.रत्नागिरी) येथील देवरुख ते मार्लेश्वर या रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मार्गावर पर्यटकांची फार मोठ्या प्रमाणात वाहतूक वर्दळ असल्यामुळे देवरुख ते मार्लेश्वर या रस्त्याचे नुतनीकरण करण्याची मागणी होत असूनही त्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची पाहणी केली आहे काय व त्यानुसार सदर रस्त्याचे नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०१-१०-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

जिल्हाधिकारी यांच्या अहवालानुसार अतिवृष्टीमुळे रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर खड्डे पडले होते. मात्र, द्विवार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत रस्त्याचे खड्डे डांबराने पूर्ण पणे भरुन घेण्यात आले आहेत. तसेच रस्त्याच्या साईड पट्टीवरील झाडी गवत कापण्यात आलेले आहे व साईड पट्ट्या मुरुमाने भरुन घेण्यात येऊन रस्ता सुस्थितीत ठेवण्यात आलेला आहे.
(३) रस्त्याची पूर्णपणे पाहणी करण्यात आलेली असून सदरच्या रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करणे हे काम हायब्रीड ॲन्युइटी सन २०१७-१८ अंतर्गत रूपये १६१२८.०० लक्ष किंमतीचे मंजूर असून सदर कामाची निविदा प्रक्रिया चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पैनगंगा नदीवर (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) बिटरगाव व बोरी सातारी येथे बंधारे मंजूर करुन निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(१९) १०२१०४ (२६-१२-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पैनगंगा नदीवर (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) बिटरगाव व बोरी सातारी येथे बंधारे मंजूर करुन निधी उपलब्ध करुन देणेबाबत माहे एप्रिल, २०१७ पासून स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.जलसंधारण मंत्री यांना लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१८) :** (१) होय,
(२) पैनगंगा नदीवर बोरी (चातारी) येथे कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा बांधण्याची मागणी आहे. तो भाग उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात आहे. त्यामुळे सिंचनासाठी बंधारा प्रस्तावित करता येत नाही. तथापि, सिंचनाऐवजी पिण्याच्या पाण्यासाठी बंधारा बांधण्याचे अंदाजपत्रक करण्यासाठी सर्वेक्षणाची कार्यवाही, मा. आमदार यांचे मागणी प्रमाणे हाती घेतली आहे.

पैनगंगा नदीवरील बिटरगांव येथील बंधा-याबाबत दि.१८.०२.२०१८ रोजी स्थळ पाहणी करण्यात आली आहे. येथे पैनगंगा नदीवरील टाकळी को.प.बंधाऱ्याप्रमाणे पुल वजा को.प.बंधाऱ्याची गावकऱ्यांची मागणी आहे. सदर स्थळ सर्वेक्षणाअंतर्गत आहे. सर्वेक्षणानंतर पुढील कार्यवाही हाती घेण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे अर्नाळा किल्ला (ता.वसई, जि.पालघर) येथे जाण्यासाठी स्कायवॉक/रोप-वे तयार करण्याबाबत**

**(२०) १०२८१३ (०१-०१-२०१८). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्नाळा किल्लावासीयांना तसेच पर्यटकांना किल्ल्यात जाण्यासाठी फेरीबोटीचा वापर करावा लागत असल्याने अर्नाळा किल्ल्यावर जाण्या-येण्यासाठी स्कायवॉक अथवा रोप-वे बांधण्यात यावा अशी लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०१२ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार सदर ठिकाणी स्कायवॉक अथवा रोप-वे बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०४-१०-२०१८) :** (१) होय

(२) व (३) वसई तालुक्यातील अर्नाळा किल्ल्यात जाण्यासाठी स्कायवॉकसाठी जागेची उपलब्धता आणि कामाचे अंदाजपत्रकासह जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून प्रस्ताव मागविण्यात आलेला आहे. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यावर त्यावर नियामोचित कार्यवाही करण्यात येईल.

---

**विदर्भातील गोसीखुर्द प्रकल्पाच्या मोखाबर्डी उपसा सिंचन योजनेतील गैरव्यवहाराबाबत**

**(२१) १०४८६९ (२८-०३-२०१८). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **लाभक्षेत्र विकास विभाग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसीखुर्द राष्ट्रीय सिंचन प्रकल्पातील कालव्यांच्या बांधकाम निविदेतील गैरव्यवहार प्रकरणी लाचलुचपती पथकाने मंगळावर दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी विशेष सत्र न्यायालयात ५ अधिकारी व कंत्राटदारांसह एकूण १२ आरोपीं विरुध्द ४५०० पानांचे दोषारोपपत्र दाखल केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोखाबर्डी योजनेतील पुच्छ शाखा कालव्याच्या बांधकामासाठी सुरवातीस ५१ कोटी ९ लाख रुपयांचे कंत्राट निश्चित झाल्यानंतर त्यामध्ये अवैधरित्या वाढ करून आर.जे.शाह कंपनी व डी.ठक्कर कंट्रक्शन कंपनीला एकूण ५६ कोटी ५७ लाख रुपयांचे कंत्राट देवून शासनास अतिरिक्त भार बसला आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार अधिका-यांकडून गैरव्यवहाराची रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०९-२०१८) :** (१) होय.

(२) सदर कामाची मुळ किंमत रु. ५१,०९,५७,९८४/- इतकी होती. निविदा सुधारित किंमतीवर कंत्राटदाराचा देकार ४.९८ टक्के अधिक म्हणजे रु. ५६,५७,३२,६८०/- आला. सदर देकार हा विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या सक्षम स्तरावरील मान्यतेनुसार दिनांक २७.०८.२००९ रोजी कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आला.

मात्र कार्यस्थळी कंत्राटदारामार्फत कोणतेही काम करण्यात आले नाही. तसेच शासन पत्र दिनांक २१.०७.२०१६ अन्वये सदर निविदा करार विखंडीत करण्यात आला त्यामुळे या निविदा प्रक्रियेत शासनास कोणताही अतिरिक्त भार बसला नाही.

(३) व (४) याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांचेमार्फत चौकशी सुरु आहे.

---

**गोसीखुर्द प्रकल्पाच्या अपूर्ण कालव्यामध्ये बुडून मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(२२) १०७५५४ (१२-०४-२०१८). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसीखुर्द प्रकल्पाच्या अपूर्ण कालव्यामध्ये बुडून मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना आर्थिक सानुग्रह मदत करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांचेकडे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाच्या जलसंपदा विभागाने गोसीखुर्द प्रकल्पाच्या अपूर्ण कालव्यामध्ये बुडून मृत्युमुखी पडलेल्या कुणाल पांडव यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मयत व्यक्तीच्या कुटूंबियांना किती व कधी पर्यन्त आर्थिक मदत देण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-०९-२०१८) :** (१) होय.

(२) दिनांक १०/६/२०१४ रोजी पंचांना बोलावून पंचनामा झाला असता, घोडाझरी शाखा कालव्याचे खोदकामामध्ये मध्यभागी R.C.C. Arch चे वर मृतक चिन्नु (कुणाल) पांडव व चेतन पांडव हे दोघे जण उभे राहून फोटो काढत असतांना कुणाल यांचा पाय घसरल्याने ती व्यक्ती पाण्यात बुडुन मरण पावली. या पंचनाम्यावरुन असे निदर्शनास येते की, यात कंत्राटदार किंवा प्रशासन यांचे दुर्लक्षामुळे अपघात झालेला नाही. सदर मृत्युप्रकरणी कंत्राटदार व प्रशासन जबाबदार नसल्याने जलसंपदा विभागामार्फत आर्थिक भरपाई देणे अभिप्रेत नाही.

(३) जलसंपदा विभागाकडून आर्थिक मदतीबाबत कार्यवाही अपेक्षित नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा परिषदेमध्ये झिरो पेडन्सी अभियान राबविण्याचे**
**आदेश देऊनही कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(२३) १०७५९१ (२८-०३-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने प्रलंबित कामाचा निपटारा तात्काळ होण्यासाठी विकास कामाचे आवश्यक दस्तावेज सुसूत्रता व्हावी यासाठी जिल्हा परिषदेमध्ये झिरो पेडन्सी अभियान राबविण्याचे आदेश दिले होते व नागपूर जिल्हा परिषदमध्ये हे अभियान मोठया सक्तीने राबवूनही कामे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या आदेशानुसार नागपूर जि.प च्या सीईओंनी झिरो पेडन्सीसाठी सर्व विभागाला हिवाळी अधिवेशनादरम्यान ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिवांनी हे पेरझेन्टेशन दाखविले असुन ही पेडन्सी जुन्या दस्तऐवजापलिकडे काही नव्हते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-१०-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्यातील सर्व जिल्हा परिषदा व पंचायत समिती कार्यालयातील अभिलेखे आणि अभिलेख कक्षातील अभिलेखे अद्ययावत करणे तसेच नागरिकांच्या व प्रशासकीय कामकाजात होणारा विलंब टाळून सर्व थकीत प्रकरणांचा निपटारा करणे व विशिष्ट कालमर्यादेत प्रकरणे निर्गत करण्यासाठी "झिरो पेंडन्सी ॲन्ड डेली डिस्पोजल" हा उपक्रम ग्रामविकास विभागाच्या दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये राबविण्याचे आदेश देण्यात आलेले होते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोनुर्ले (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथील लघु पाटबंधारे तलावाचे**
**काम प्रलंबित असल्याबाबत**

**(२४) १०८०५० (२८-०३-२०१८). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनुर्ले (ता.शाहुवाडी,जि.कोल्हापूर) येथील लघु पाटबंधारे तलावास सन २००० साली प्रशासकीय मान्यता मिळाली असून सदर तलावामुळे आजूबाजूचा अनेक परिसर जलयुक्त होवून शेतीसाठी तसेच अन्य सर्व कामांसाठी मुबलक पाणी मिळणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलावासाठी आवश्यक असणाऱ्या भूसंपादनाचे काम पूर्ण झाले असून तलावाचा खर्च पावणे आठ कोटींवरून ३४ कोटीवर पोहोचला आहे तसेच सदर प्रकल्पाचे काम सद्यस्थितीत मार्गी लावण्याकरिता ८.५ कोटींचा निधी शिल्लक आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार निधी अभावी अपूर्ण असलेले सदर प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यासाठी निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-१०-२०१८) :** (१) होय.

प्रकल्पांतर्गत ३.६५ द.ल.घ.मी. उपयुक्त पाणीसाठा होणार असून, ४६५ हे. क्षेत्र (पीकक्षेत्र ८८४ हे.) सिंचनाखाली येणार आहे. होणा-या पाणीसाठ्यापैकी सिंचनासाठी ३.४४ द.ल.घ.मी.व पिण्यासाठी ०.०१ द.लघ.मी. अशी तरतुद आहे.
(२) प्रकल्पासाठी आवश्यक भूसंपादन पूर्ण झाले आहे.प्रकल्पाची मूळ प्रशासकिय मान्यता प्राप्त किंमत रु. ७.७२ कोटी असून प्रस्तावित प्रथम सुप्रमा प्रस्तावाची किंमत रु. ४६.६४ कोटी इतकी आहे. प्रकल्पावर फेब्रुवारी २०१८ अखेर रु.९.१९ कोटी इतका खर्च झाला असून वर्ष २०१८-१९ करिता रु.५.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
(३) याबाबत चौकशी करण्याचा प्रश्न उद्धवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्री. क्षेत्र कौंडण्यपूर, (ता. तिवसा, जि. अमरावती) विकासापासुन वंचित असल्याबाबत**

**(२५) १०८१२८ (०७-०४-२०१८). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री. क्षेत्र कौंडण्यपूर, (ता. तिवसा, जि. अमरावती) येथे विकासापासून वंचित राहिली असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्यटनक्षेत्राच्या विकासाला चालना देणा-या घोषणा वारंवार होत असतानाही अमरावती जिल्ह्यातील चिखलदरासारखे विदर्भातील थंड हवेच्या ठिकाणी पर्यटकासाठी सुविधा नसल्याने पर्यटक येत नाहीत तसेच चिखलदरा, श्री श्रेत्र बहिरम (जि.अमरावती) मेळघाट व्याघ्रप्रकल्पं, छत्री तलाव, यासह धार्मिक स्थळ म्हणून ओळख असलेल्या अंबादेवी, एकवीरादेवी, गुरुकुंज मोझरी, अमरावतीपासूनच जवळच मुक्ता गिरी अशी अनेक ठिकाणे महाराष्ट्राच्या नकाशावर सुध्दा अधोरेखित नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त पर्यटन स्थळांचा विकास करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०४-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

श्री क्षेत्र कौंडण्यपूर, ता.तिवसा, जि.अमरावती या क्षेत्राच्या रू.२० कोटी किंमतीच्या विकास आराखड्यास नियोजन विभागाने मान्यता देऊन आतापर्यंत या कामांसाठी रूपये १५.१० कोटी निधी वितरीत केलेला आहे.

(२) चिखलदरा, जि.अमरावतीच्या नगरपरिषद क्षेत्रात विकास करण्यासाठी नियोजन प्राधिकरण म्हणून "सिडको" ची नियुक्ती करण्यात आली आहे. चिखलदरा या ठिकाणी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे ४ पर्यटक निवास अस्तित्वात असून त्यापैकी २ पर्यटक निवास भाडेपट्ट्याने दिलेले आहेत. चिखलदरा पर्यटन स्थळाच्या विकासासाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजनेमधून रूपये २२७.०९ लक्ष निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्याशिवाय प्रादेशिक पर्यटन विकास योजनेमधून, श्री क्षेत्र बहिरम येथील रूपये १०७.८० लक्षची पर्यटन विकास कामे करण्यात आली असून, मोझरी पॉईंट येथील पर्यटक निवास सोयीसुविधा, हॉलिडे रिसॉर्ट व साहसी क्रीडा संकुल यासाठी रूपये ९२७ लक्षच्या कामांना मान्यता देऊन रूपये २९० लक्ष वितरीत केलेले आहेत.

तसेच नगर विकास विभागाने, छत्री तलाव सौंदर्यीकरण व परिसरातील सुशोभिकरणाच्या कामासाठी रूपये २४.७० कोटी निधी महापालिकेस वितरीत केलेला असून, अंबादेवी व एकविरा देवी या देवस्थानांच्या विकास कामांसाठी रूपये १५९.१९ लक्ष निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

श्री क्षेत्र मोझरी येथील रूपये १५०.८३ कोटी किंमतीच्या विकास कामांच्या विकास आराखड्यास नियोजन विभागाने मान्यता देऊन सदर निधी खर्च करण्यात आलेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुर्नवसित 'अ' व 'ब' वर्गातील गावांच्या अंतर्गत रस्त्याचे व गटाराचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२६) १०८२२० (०४-०४-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये सन १९९३ मध्ये महाप्रलयकारी भुकंप झाला होता तेव्हा तेथील भुकंपग्रस्त गावांचे पुर्नवसन झाले होते त्यापैकी बऱ्याच गावांच्या अंतर्गत रस्त्यांची कामे सन १९९३ ते १९९५ दरम्यान झालेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरिल पुर्नवसित 'अ' व 'ब' वर्गातील गावांच्या अंतर्गत रस्त्याचे व गटाराचे काम झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदरिल 'अ' व 'ब' वर्गाच्या गावातील अंतर्गत रस्ते व गटाराचे काम महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२४-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार लोहारा तालुक्यातील मौ.राजेगाव,चिंचोली रेबे,सास्तुर, कास्ती (खु.),कास्ती (बु.),कानेगाव व हिप्परगा (स) येथील अंतर्गत रस्त्यांची कामे करण्यात आली आहेत. तसेच यापुढेही ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार गाव अंतर्गत रस्त्यांची कामे करण्यात येतील.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील धाड परिसरातील मासरुळ व करडी या लघु प्रकल्पाबाबतची बुलढाणा पाटबंधारे विभागाकडे कोणतीही दस्ताऐवज उपलब्ध नसल्याने या दोन्हीही प्रकल्पांची पाटबंधारे विभागाकडे नोंद नसल्याबाबत**

**(२७) १०८६१७ (०४-०४-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील धाड परिसरातील मासरुळ व करडी या लघु प्रकल्पाबाबतची बुलढाणा पाटबंधारे विभागाकडे कोणतीही दस्ताऐवज उपलब्ध नसल्याने या दोन्हीही प्रकल्पांची पाटबंधारे विभागाच्या रेकॉर्ड मध्ये नोंद नसल्याने पाणीउपसाचा परवाना काढण्यासाठी शेतकऱ्यांना बुलढाणा व शेगाव येथे जावे लागते तसेच या प्रकल्पातून पाणी उपसा होत नसल्याने शासनाच्या लाखो रुपयांचा महसुलाचे नुकसान होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांना पाणी उपशाचा परवाना देण्यासह सदरहू प्रकल्पाचे हस्तांतरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

बुलढाणा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, बुलढाणा अंतर्गत लघु पाटबंधारे विभाग क्र.२, चिखली (ह.मु.शेगांव) या कार्यालयाकडून मासरुळ व करडी हे लघु प्रकल्प शासन निर्णय क्र.(१) महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र.आढावा २०१५/ प्र.क्र.१२ /२०१५/आ.(प्र.शि.)/मंत्रालय,मुंबई/दि.३०/१०/ २०१५ व (२) महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन आदेश क्र.आढावा२०१५/प्र.क्र.१२/२०१५/आ.(प्र.शि.)/मंत्रालय, मुंबई/दि.०४/१२/२०१५ नुसार बुलढाणा पाटबंधारे विभाग, बुलढाणा या कार्यालयाकडे हस्तांतरीत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार, सिंचन व्यवस्थापनसंबंधीचे सर्व दस्तऐवज उपविभागीय अधिकारी, पेनटाकळी प्रकल्प, व्यवस्थापन उपविभाग, मेहकर यांना एप्रिल २०१७ मध्ये हस्तांतरीत करण्यात असून सदयस्थितीत करडी संग्राहक तलावातून ४१८.१३ हे. व मसरुळ ल.पा.

प्रकल्पातून ३१.७७ हे. असे एकूण ४४९.९० हे. क्षेत्राला दीर्घ मुदतीचे परवाने तत्कालीन कार्यकारी अभियंता ल.पा.वि.क्र.२ चिखली या कार्यालयाने प्रदान केले आहे.

सन.२०१७-१८ या वर्षाकरिता बुलढाणा पाटबंधारे विभागाकडे अर्ज करणा-या विभागास प्राप्त, लाभक्षेत्रात असणा-या सर्व शेतक-यांना हंगामी सिंचनासाठी परवाने देण्यात आले आहेत, त्यामुळे शासनाच्या महसुलांचे नुकसान झालेले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटबंधारे प्रकल्प मंडळ, चंद्रपुर अंतर्गत येणाऱ्या घोडाझरीच्या तलावाच्या मुख्य कालव्याच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(२८) १०८६५५ (१३-०४-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अधिक्षक अभियंता चंद्रपुर, पाटबंधारे प्रकल्प मंडळ, चंद्रपुर अंतर्गत येणाऱ्या घोडाझरी तलावाच्या मुख्य कालव्याचे २० कोटी रुपयाची कामे करण्यात आली, सदर कामामध्ये तलावाच्या मुख्य कालव्यावरील खडकी ते सोनपुर गावाजवळ लाईनिंग केलेल्या कामात जाडी कमी असणे, लाईनींगखाली मुरूम नसणे, एम.बी. मध्ये रेकार्ड केल्याप्रमाणे जाग्यावर लाईनिंग नाही, तसेच सर्विस रोडवर मुरूम, लाईनिंग क्रॅक (तडे गेलेले आहे) याप्रमाणे कामे न करता देयके घेणे अश्या सदर प्रकरणी अखिल भारतीय पत्रकार संघ व सामाजिक कार्यकर्ते उमेश चौबे यांनी दिनांक ३० मार्च,२०१६ रोजी कार्यकारी संचालक विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर व मुख्य अभियंता जलसंपदा विभाग, सिंचन सेवा भवन, नागपूर यांना दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ व १६ मार्च, २०१६ रोजी वारंवार सदर प्रकरणी दोषीवर चौकशी करून कार्यवाहीबाबत तक्रारी दिल्या परंतु अद्यापपर्यंत कार्यवाही न झाल्याने मा. मुख्यमंत्री यांना दिनांक १९ डिसेंबर,२०१७ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधीने तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार दोषी कंत्राटदार व अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०९-२०१८) :** (१) होय.

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, चंद्रपूर पाटबंधारे प्रकल्प मंडळ, चंद्रपूर यांनी चौकशी अहवाल मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर यांना सादर केला. सदर तक्रारीत काहीही तथ्य आढळून आले नसल्यामुळे तक्रार दप्तर दाखल करण्याची शिफारस अहवालात करण्यात आली त्यानुसार मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर यांनी तक्रार दप्तर दाखल केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कुर्डुवाडी (ता.माढा,जि.सोलापूर) येथील भीमा विकास उपविभाग क्र.१० च्या कार्यालयीन कर्मचा-यांसाठी निवासी वसाहत बांधणेबाबत**

**(२९) १०९०२७ (१०-०४-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुर्डुवाडी (ता.माढा, जि.सोलापूर) येथील भीमा विकास उपविभाग क्र.१० च्या कार्यालयीन कर्मचा-यांसाठी निवासी वसाहत बांधणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०७ मार्च,२०१७ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०९-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

श्री.ना.गो.पाटील वि.स.स. यांचे दिनांक २०/४/२०१७ चे मा.मंत्री, जलसंपदा यांना लिहिलेले पत्र प्राप्त झाले आहे.

(२) सदरहू पत्राच्या अनुषंगाने दिनांक १७/६/२०१७ रोजी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार योग्य ती कार्यवाही करण्याबाबत क्षेत्रिय कार्यालयास कळविण्यात आले आहे. तथापि, निवासी वसाहत बांधण्यासाठी कर्मचाऱ्यांची कोणतीही मागणी क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निम्न वर्धा प्रकल्प अंतर्गत पिंपळखुटा (ता.धामनगाव रेल्वे, जि.अमरावती) या गावाचे पूर्णता पूनर्वसन करणेबाबत**

**(३०) १०९०६० (१०-०४-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निम्न वर्धा प्रकल्प अंतर्गत पिंपळखुटा (ता.धामनगाव रेल्वे, जि.अमरावती) या गावातील घरांमध्ये पावसाळ्यात येणारा ओलावा व आरोग्यावर होणारा दुष्परीणाम यामुळे सदर गावाचे पूर्णता पुनर्वसन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०९-२०१८) :** (१) होय.

(२) मौजा पिंपळखुटा या गावातील घरामध्ये पावसाळयात येणारा ओलावा हा निम्न वर्धा प्रकल्पाच्या पाण्यामुळे येतो की पावसाच्या पाण्यामुळे येतो याबाबत वरिष्ठ भू-वैज्ञानिक,

भू-जल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा, अमरावती, मृद सर्व्हेक्षण अधिकारी, नागपूर तसेच अधीक्षक अभियंता, पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण मंडळ, नागपूर या कार्यालयाकडून माहिती संकलित करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. सदर माहितीच्या आधारे प्रस्तुत प्रकरणी पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदेड जिल्हयात मनरेगा अंतर्गत मजूरांना मिळणारा रोजगार व सिंचन विहीरींचा कुशल निधी प्रलंबित असल्याबाबत

**(३१) १०९१४८ (२८-०३-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयात मनरेगा अंतर्गत गेल्या ५ महिन्यापासून हजारो मजूरांचा रोजगार व सिंचन विहीरींचा कुशल निधी मिळत नसल्यामुळे अनुदानाच्या प्रतिक्षेत असलेल्या लाभार्थीवर कर्ज वाढले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास,त्यानुसार लाभार्थीना सदरील थकीत अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२७-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र, अंतर्गत आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये नांदेड जिल्ह्याच्या २९,७६१ इतक्या कुटुंबाला तसेच ५२,६२१ लाभार्थीना योजनेचा लाभ देण्यात आला आहे. त्याद्वारे ९,५२,७३८ इतक्या मनुष्यदिवसांची निर्मिती झालेली आहे. या आर्थिक वर्षात नांदेड जिल्हयाने खर्च केलेला आहे.

| **बाब** | **रक्कम** |
|---|---|
| मजुरी | रु.२०२५.११ लक्ष |
| सामुग्री पुरवठा | रु.४८६.९६ लक्ष |
| **एकूण** | **रु.२५१२.०७ लक्ष** |

(२), (३) व (४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## मुंबईसह राज्यातील समुद्रात अपुऱ्या सुरक्षा व्यवस्थेमुळे होत असलेले अपघात

**(३२) १०९५७७ (०७-०४-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर**

**(वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील समुद्रात पर्यटक, मुल बुडून मरण पावल्याच्या घटना वारंवार होत आहेत पर्यटकांचा निष्काळजीपणा व अपुरी सुरक्षा व्यवस्थेमुळे या चौपाटया जीवघेण्या ठरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौपाटया, समुद्र किनारी पर्यटकाच्या सुरक्षतेची काळजी घेण्यासाठी वॉचटॉवर, मेगाफोन, फलडलाईट देखरेख यंत्रणेच्या अभावामुळे या दुर्घटनांवर नियंत्रण ठेवता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने समुद्र किनाऱ्याची पाहणी केली आहे काय व त्यानुसार मुंबईसह राज्यातील समुद्र किना-यांवर पर्यटकांच्या सुरक्षतेसाठी पोहण्याच्या साधनांशिवाय प्रथमोपचाराची साधने, जीवरक्षकांसाठी ठराविक कालावधीनंतर प्रशिक्षण त्यांचे मनोधैर्य कायम राखण्यासाठी पुरेशी काळजी घेणे, किना-यांजवळ रुग्णवाहीका तैनात करणे, वॉकीटॉकीची सोय अशा गोष्टींचीही उपलब्धता करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०१-१०-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.काही समुद्र किनाऱ्यांवर असलेल्या सुरक्षिततेच्या व्यवस्थेबरोबरच समुद्र किनाऱ्यांवर येणाऱ्या पर्यटकांच्या निष्काळजीपणामुळे, आततायी वागण्यामुळे, नेमण्यात आलेल्या जीवसुरक्षा रक्षकांच्या सूचनांकडे दुर्लक्ष केल्यामुळे पर्यटक बुडून मरण पावल्याच्या घटना झाल्याचे निदर्शनास येते.

(३) व (४) शासन निर्णय, दि.८/९/२००६ अनुसार राज्यातील ठरवून दिलेल्या समुद्र किनाऱ्यांवर (बीचेस) पर्यटकांसाठी सुरक्षिततेच्या बहुतांशी उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

या विषयाबाबत मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.८९/२०१० न्यायप्रविष्ट आहे.

---

### जायकवाडी प्रकल्पाच्या डाव्या कालव्याची झालेली दुरवस्था

**(३३) १०९८४९ (१०-०४-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जायकवाडी प्रकल्पाच्या डाव्या कालव्याची दुरवस्था झालेली असून तात्पुरती डागडूजी करुन नादुरुस्त कालव्यातूनच परभणी जिल्ह्याला सिंचनासाठी पाणी पुरवठा करण्यात येत असल्यामुळे जिल्ह्यातील ५० टक्के क्षेत्र सिंचनापासून वंचित राहिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डाव्या कालव्यावर केवळ एकच पाणीवाटप संस्था कार्यरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परभणी जिल्ह्यातील शेतक-यांना १०० टक्के सिंचनाचा लाभ मिळण्याकरिता जायकवाडी प्रकल्पाच्या डाव्या कालव्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही. जायकवाडी प्रकल्पाच्या डाव्या कालव्यावरील किमी १२२ ते २०८ व त्यावरील वितरण व्यवस्थेतील ९७४०० हेक्टर क्षेत्र जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र. २, परभणी या विभागाकडे आहे. या विभागाने यांत्रीकी संघटनेच्या मदतीने मुख्य कालवा, शाखा कालवा व वितरीकेवरील आवश्यक त्या ठिकाणची गाळ (१६७.६१९ सघमी) व भराव (६५.६६१ सघमी) दुरुस्तीची कामे करुन घेऊन जास्तीत जास्त क्षेत्र सिंचनाखाली आणलेले आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये खरीप हंगाम १५८५५ हेक्टर, रब्बी हंगाम ४८९८२ हेक्टर व उन्हाळी हंगाम २०४५० हेक्टर क्षेत्र आहे, असे एकूण ८५२८७ हेक्टर क्षेत्र म्हणजेच ८७.५६% क्षेत्राला सिंचनाचा लाभ देण्यात आला आहे.

(२) व (३) डाव्या कालव्यावरील सहकार कायदा १९७६ अंतर्गत स्थापन केलेल्या १०० पाणी वापर संस्था कार्यरत होत्या. यापैकी परभणी जिल्हयामध्ये ६४ संस्था कार्यान्वित होत्या. तथापि महाराष्ट्र सिंचन पध्दतीने शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ अंतर्गत सर्व क्षेत्रावर पाणी वापर संस्था स्थापन करावयाच्या असल्यामुळे शासन निर्णय दि. ६/०४/२०१६ नुसार सहकार कायद्याच्या पाणी वापर संस्थांची नोंदणी संबंधीत उपनिबंधक सहकारी संस्था यांचेमार्फत रद्द करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे म.सि.प.शे.व्य. अधिनियम २००५ अंतर्गत पाणी वापर संस्था स्थापन करुन कालव्याची पुर्नस्थापना करुन पाणी वापर संस्थांना क्षेत्र हस्तांतरण करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच कालवा पुर्नस्थापनेसाठी केंद्र शासनाच्या ISBIG या योजनेअंतर्गत पैठण डाव्या व उजव्या कालव्याच्या दुरुस्तीसाठी रु. १९११.६९ कोटीचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील उजनी धरणाची कामे अपूर्ण असल्याबाबत**

**(३४) ११००७६ (१३-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील उजनी धरणाची कामे सुरू होऊन ४० वर्ष पूर्ण होऊनही अद्यापि जवळपास ४ किमी लांबीची कामे अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उजनी धरणाची उर्वरित कामे पूर्ण करणे साठी सुमारे १० कोटी रुपये निधीची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) तसेच या उजनी कार्यालयातील अधिकारी सेवानिवृत्त झाल्यामुळे अतिरिक्त भार इतर अधिकारी यांचेकडे असून या कार्यालयाला कायमस्वरूपी अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती नसल्याकारणाने या उजनी धरणाच्या उर्वरित कामाना विलंब होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उजनी कार्यालयातील रिक्त पदे भरण्यासह उजनी धरणाच्या उर्वरित कामाकरिता तात्काळ निधी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०९-२०१८) :** (१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील उजनी उजव्या कालव्याची लांबी ८८ ते १३२ कि.मी. पर्यंत आहे. त्यावरील मातीकाम, बांधकामे पूर्ण झाली असून, अस्तरीकरणाचे ४ कि.मी. चे काम अपूर्ण आहे.

(२) होय.

अस्तरीकरणाच्या कामाला रु.१२ कोटी निधी आवश्यक आहे.

(३) नाही.

श्री. बा. शा. बिराजदार, कार्यकारी अभियंता यांची शासन आदेश दि.१६/०२/२०१८ अन्वये कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र. ९, मंगळवेढा, जि. सोलापूर या रिक्त पदावर करण्यात आली आहे. त्यानुसार श्री. बिराजदार, का.अ. हे दि.०५/०३/२०१८ रोजी सदर पदावर रुजु झाले आहेत.

(४) उजनी प्रकल्पाचा खर्च मंजूर सु.प्र.मा. किंमत रु.१४०५.६७ कोटी पेक्षा जास्त झाला आहे. त्यामुळे उर्वरित निधी खर्च करण्यात अडचणी येत आहे. तथापि सुधारित प्र.मा. अहवाल तयार असून तो राज्य तांत्रिक सल्लागार समिती क्र. २, पुणे यांच्याकडे सादर आहे व त्या प्रस्तावाची तपासणी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सावली (जि.चंद्रपूर) तालूक्यातील आसोलामेंढा तलावाच्या परिसरास पर्यटन क्षेत्र घोषीत करण्याबाबत

**(३५) ११०७४० (१०-०४-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आसोलामेंढा (ता.सावली,जि.चंद्रपूर) तलावास देशातील व विदेशातील हजारो पर्यटक पर्यटकासाठी येतात मात्र या परिसरास अघापही पर्यटन क्षेत्र म्हणून घोषीत करण्यात आलेले नसल्यामुळे या परिसरातील हजारो पर्यटकांना सोयी सवलतीपासून वंचित राहावे लागत असल्याने या परिसरास पर्यटन क्षेत्र घोषीत करून या परिसराचा विकास करण्यासाठी

नागपूरच्या वास्तूशास्त्रास अंदाजपत्रकासह नकाशा सादर करण्यास सागंण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसराचा विकास करण्यासाठी नागपूरच्या वास्तूशास्त्राने अंदाजपत्रकासह नकाशा सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार आसोलामेंढा तलावास पर्यटन क्षेत्र घोषीत करून त्या परिसराचा विकास करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०१-१०-२०१८) :** (१) नाही. तथापि, चंद्रपूर जिल्ह्यातील सावली तहसीलमध्ये असोलामेंढा क्षेत्रास “क” वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्यामार्फत देण्यात आलेला आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्री क्षेत्र बाहुबली (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील नळपाणी पुरवठा योजनेस निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३६) १११७१८ (१९-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री क्षेत्र बाहुबली (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील नळपाणी पुरवठा योजनेस तांत्रिक मान्यता मिळाली असून जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांचेमार्फत प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांच्याकडे प्रशासकीय मान्यतेसह निधी उपलब्ध करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २५ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त प्रस्तावास मंजूरी व निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०१-१०-२०१८) :** (१) होय.

(२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय, क्र.बैठक-२०१७/१०/प्र.क्र.९६७/पर्यटन, दि.६/२/२०१८ अन्वये श्री क्षेत्र बाहुबली, ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर येथील नळपाणी पुरवठा करणे या कामाच्या रू.२२७.५६ लक्षच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देऊन रू.३०.०० लक्ष निधी जिल्हाधिकारी,कोल्हापूर यांना वितरीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील मांजरा नदीवर तेलंगणा व महाराष्ट्र या दोन राज्याच्या सयुंक्त चेकडॅम उभारण्याबाबत**

**(३७) ११२०२३ (११-०४-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र व तेलंगणा या राज्याच्या सिमावर्ती भागातील मौ.येसगी (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील मांजरा नदीवरील जुन्या पूलाचे चेकडॅममध्ये रुपांतरीत करण्याबाबतचा अहवाल शासनाने दिनांक २६ डिसेंबर,२०१६ रोजीच्या पत्रान्वये मुख्य अभियंता (ज.सं.) जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांच्याकडून मागविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त चेकडॅमबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालाचे स्वरुप काय आहे व त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०९-२०१८) :**

(१) शासन पत्र क्र.मुमंस-२०१६/(९३/२०१६)/ लपा-२, दिनांक ०३/११/२०१६ नुसार अहवाल मागविला आहे.

(२) शासनास अहवाल प्राप्त झाला नाही.

(३) अहवाल शासनास अद्याप सादर नाही. मांजरा नदीवर असलेल्या जुन्या पुलाचे रुपांतर चेक डॅममधे करावी अशी मागणी आहे. परंतु तो पुल १०० वर्षापेक्षा जुना आहे. तसेच या स्थळी बंधा-यासाठी आवश्यक पाया खोलवर असल्याने प्राथमिकदृष्ट्या प्रस्ताव आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य दिसून येत नाही. तसेच अद्याप तेलंगणा राज्याची सहमती अप्राप्त आहे.

मागणी करण्यात आलेल्या चेकडॅमचा मुद्दा हा आंतरराज्यीय असल्याने आणि चेकडॅमचे लाभ हे दोन्ही राज्यास होणार असल्याने पुढील कार्यवाही दोन्ही राज्यांच्या समन्वयाने आणि सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषणानंतरच करणे शक्य होईल. तत्पुर्वी सदर ठिकाणी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र घेण्याची कार्यवाही करावी लागेल. त्याचप्रमाणे मांजरा नदीवरील जुना पूल हा ब्रिटीशकालीन असनू १९३४ मध्ये बांधण्यात आलेला असल्याने अशा प्रकारच्या जुन्या जीर्ण झालेल्या पुलाचे रुपांतर चेकडॅममध्ये करणे व्यवहार्य नाही आणि यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहमतीने पुढील कार्यवाही करावी लागेल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृष्णा मराठवाडा सिंचन योजना टप्पा क्र.२ अंतर्गत अपूर्ण कामासाठी निधी देणेबाबत**

**(३८) ११२९९७ (१२-०४-२०१८). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा मराठवाडा सिंचन योजना टप्पा क्र.२ मधील साठवण तलावाची उंची वाढवणे, कॅनोलसाठी भूसंपादन व खोदकाम करणे ही कामे पूर्ण झालेली असून योजनेंतर्गत प्रस्तावित कामापैकी ७०% कामे पूर्ण होवून निधी अभावी कामे बंद आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उध्दरन नलिका व पंचिग हाउस उभारणीची कामे करणे अद्याप बाकी आहेत तसेच सन २०११ मध्ये भूसंपादन होऊनही अद्याप शेतकऱ्याचा मोबदला दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर योजनेंतर्गतची कामे पूर्ण करण्यासाठी निधी देण्यासह भूसंपादन केलेल्या शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०९-२०१८) :** (१) कृष्णा मराठवाडा उपसा सिंचन योजना क्रमांक २ अंतर्गत साठवण तलावांची बहुतांशी कामे पूर्ण झाली आहेत. कालव्याची व उर्ध्वनलिकांची कामे प्रगतीपथावर असून, विविध टप्प्यातील उपसा घटकांची संकल्पने मंजूर झाल्यानंतर पंपगृह व पंपीग मशीनरीची कामे पूर्ण करण्यात येऊन योजना पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(२) उध्दरण नलिका व पंपहाऊसची कामे प्राधान्याने हाती घेण्यात येत आहेत. प्रथम टप्प्यातील कालव्याचा भूसंपादनाचा मोबदला शेतकऱ्यांना मे, २०१७ मध्ये देण्यात आलेला आहे. तिसऱ्या टप्प्यातील भूसंपादनाचा अंतिम निवाडा जाहीर झाल्यानंतर त्यांना मोबदला देण्यात येईल.
(३) नवीन भूसंपादन कायदयानुसार भूसंपादनाचा मावेजा देण्यासाठीची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. तसेच त्यासाठी निधीची तरतुद सन २०१८-१९ या वर्षामध्ये करण्यात आली असून, भूसंपादन केलेल्या शेतकऱ्यांना मोबदला देणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील गावांमध्ये पाझर चाऱ्याची कामे करण्याबाबत

**(३९) ११३१७१ (१३-०४-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) असल्यास, दौंड व शिरुर तालुक्यातील मुळा मुठा आणि भिमा नदीच्या दोन्ही बाजुला सुमारे पाच किमी अंतरावरील अनेक गावामध्ये ३० टक्क्याहून अधिक शेत जमीनी नापीक झाल्या असून शिरुर तालुक्यातील मांडवगण फराटा, राजणगाव सांडस, गणेगाव, बाभुळसर, आलेगाव पागा, वडगाव रासाई, तांदळी, नागरगाव, सादलगाव या गावांमध्ये पाझर चाऱ्याची कामे व्हावीत यासाठी वारंवार मागणी करुनही कुठलीही कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर गावांमध्ये पाझार चाऱ्याची कामे तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

शिरूर तालुक्यातील पाझर चाऱ्यांच्या मागणीनुसार मांडवगण फराटा-अ, मांडवगण फराटा-क, रांजणगाव सांडस (पळसपट्टी), रांजणगाव (रणपिसे मळा), वडगाव रासाई-२, तांदळी-२, नागरगाव-३, सादलगाव-२ या ठिकाणी नविन चर योजनांची अंदाजपत्रके तयार करण्यात आली आहेत. आलेगाव पागा येथिल बाधित क्षेत्र विखुरलेल्या स्वरूपात असल्याने सदर ठिकाणी नविन चर योजना करता येत नाही. तसेच, बाभुळसर येथील पुर्ण झालेल्या बाभुळसर-१ या चर योजनेची दुरूस्ती प्रस्तावित आहे.

(२) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

चर योजनेचे मापदंड सुधारीत करण्याची बाब शासन स्तरावर प्रगती पथावर असून मापदंड निश्चितीनंतर प्रशासकीय मान्यतेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हेत (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील अरूणा नदीतील गाळ उपसा करून खोलीकरण करणेबाबत

**(४०) ११५३४५ (१२-०४-२०१८). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हेत (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील अरूणा नदीतील गाळ उपसा करून खोलीकरण करून पाण्याची पातळी वाढवून जलस्त्रोत अधिक प्रभावित करण्याबाबत ग्रामपंचायत हेत तसेच ग्रामस्थांनी मा.जलसंपदा मंत्री, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग, जिल्हा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग,वैभववाडी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदरहू मागणीनुसार अरूणा नदीतील गाळ उपसा करुन खोलीकरण व सरळीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कळंब (जि.यवतमाळ) तालुक्यातील आष्टी, मलकापुरनरसापुर, इचोरा या गावांना सिंचनाकरीता बेबंळा कालव्याचे पाणी मिळण्याबाबत

**(४१) ११५७३९ (१२-०४-२०१८). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (जि.यवतमाळ) तालुक्यातील आष्ट नरसापुर, इचोरा, तरोडा पिपळगांव होरे, कामठवाडा, सोनेगांव आमला ही गावे बेबंळा कालव्याच्या उजव्या बाजूने येतात शेत शिवाराजवळ पाणी दिसत असतांना त्या भागात कालव्याचे काम न झाल्याने शेतक-यांना शेती सिंचनाकरीता पाणी मिळत नसल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार शेतक-यांना सिंचनाचे पाणी मिळण्यासाठी कालवे निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०९-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) बेंबळा प्रकल्पास प्रकल्प अहवालानुसार फक्त उजवा मुख्य कालवा प्रस्तावित आहे. सदर कालवा कंटुर (समतल रेषा) पध्दतीचा असल्याने मुख्य कालव्याच्या एकाच बाजूस (डाव्या) लाभक्षेत्र उपलब्ध आहे. उजव्या बाजूचे क्षेत्र हे तुलनात्मक दृष्टया उंचावर असल्याने कालव्याव्दारे सिंचन होणे अशक्य आहे. अर्थात उजव्या बाजूस कालवा तलांकाचे अनुषंगाने लाभक्षेत्र उपलब्ध होत नसल्याने उजव्या बाजूस कालवे प्रस्तावित नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जलसंपदा विभागातील ९००० पदे रिक्त असल्याबाबत**

**(४२) ११५८०६ (१२-०४-२०१८). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागात तब्बल ९००० पदे रिक्त असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या जलसंपदा विभागाने गट "क" व "ड" वर्गाची भरती सन २०१३ पासून झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०९-२०१८) :** (१), (२), (३) व (४) जलसंपदा विभागांतर्गत घेण्यात येणाऱ्या तिमाही आढाव्यानुसार विभागांतर्गत सर्व संवर्गातील पदे रिक्त असून त्यातील गट क व गट ड मधील पदांवर सन २०१३ पासून भरती करण्यात आलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, पद भरतीवर वित्त विभागाने घातलेल्या निर्बंधांच्या अनुषंगाने जलसंपदा विभागाचा आकृतीबंध सुधारीत करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून सुधारीत आकृतीबंधास मंजूरी प्राप्त झाल्यानंतर सदर रिक्त पदे तातडीने भरण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांना देण्यात येतील.

---

**मारेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील बेंबळा सिंचन प्रकल्पाच्या कालव्याची कामे अपुर्णावस्थेत असल्याबाबत**

**(४३) ११५८२४ (१२-०४-२०१८). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मारेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील बेंबळा सिंचन प्रकल्पाच्या कालव्याची कामे अपुर्णावस्थेत असल्यामुळे मारेगांव, मार्डी, करणवाडी, कुंभा, आदी गावांसह संपुर्ण तालुक्यातील सिंचनाची सुविधा उपलब्ध होत नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबधीत शेतक-यांच्या शेतातुन कालवे गेले आहेत त्यांना आर्थिक सवलतीचा लाभ मिळाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर प्रकल्पाच्या कालव्याची कामे पूर्ण करण्यासह ज्या शेतक-यांच्या शेतातुन कालवे गेले त्यांना आर्थिक सवलतीचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०९-२०१८) : (**१) मुख्य कालव्याची लांबी ११३ कि.मी. असून मुख्य कालव्याची कामे पूर्ण झालेली आहे. वितरण प्रणालीची कामे मुख्य कालव्याच्या सुरूवातीपासून शेवटच्या टोकाकडे करण्यात येतात त्यानुसार मारेगाव तालुका हा मुख्य कालव्याच्या शेवटच्या भागास असल्याने वितरण प्रणालीची कामे अद्याप पूर्ण झाली नाही. परिणामी सिंचन सुविधा अद्याप उपलब्ध झाली नाही.

(२) व (३) लाभक्षेत्रातील जमीनीच्या उतारानुसार कालवा संरेखा प्रस्तावित करण्यात येते. त्या शेतामधून कालवा प्रस्तावित करणे आवश्यक ठरते अशा शेतजमीनीचे कालव्यासाठी आवश्यक तेवढयाच रुंदीचे भूसंपादन करण्यात येते. अशा भूसंपादनाचा मोबदला प्रचलीत भूसंपादन कायदयानुसार संबंधीत शेतक-यांना देण्यात येतो.

संपादीत केलेल्या अथवा संपादनासाठी प्रस्तावित असलेल्या जमीनीचा मोबदला संबंधीतांना अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या ३५ मंत्रालयीन विभागातील अ,ब,क व ड या संवर्गातील सरळसेवा व पदोन्नतीने भरावयाची १ लाख ७७ हजार २५९ पदे रिक्त असल्याबाबत**

**(४४) ११६८६३ (२६-०७-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.पांडुरंग बरोरा**

**(शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या ३५ मंत्रालयीन विभागातील अ, ब, क व ड या संवर्गातील सरळसेवा व पदोन्नतीने भरावयाची १ लाख ७७ हजार २५९ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पदांपैकी ७२ हजार पदे येत्या दोन वर्षात तातडीने भरण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ७२ हजार पदे भरण्याच्या दृष्टीने शासनाने काय नियोजन केले आहे तसेच उर्वरित १०५२५९ रिक्त पदे किती कालावधीत भरण्यात येतील,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-१०-२०१८) :** (१) माहे डिसेंबर, २०१६ अखेरच्या उपलब्ध आकडेवारीनुसार राज्य शासनाच्या ३० मंत्रालयीन विभागातील गट अ, ब, क व ड या संवर्गात एकूण १०,५९,५१४ पदे मंजूर आहेत. त्यापैकी एकूण १,५६,७४९ इतकी पदे रिक्त आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पटीने वाढविणे तसेच ग्रामीण भागात अत्यावश्यक नागरी सेवा पुरविण्याकरिता ७२ हजार रिक्त पदे भरण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांनी विधानभवनात आश्वसित केल्यानुसार सदर रिक्त पदे दोन टप्प्यात भरण्यात येणार असून शासनाने रिक्त पदे भरण्यासंदर्भातील शासन निर्णय, दि. १६ मे, २०१८ रोजी निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णयानुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने रिक्त पदे भरण्याबाबत विभागास अधिकार प्रदान केलेले आहेत. राज्य शासनाच्या विविध विभागातील व त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयातील उर्वरित रिक्त पदे भरण्याच्या प्रस्तावाबाबत प्रकरणपरत्वे साकल्याने विचार करून अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग व प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या मान्यतेने रिक्त पदे भरण्यात येतात.

(४) लागू नाही.

---

**विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र या वैधानिक विकास मंडळाने सिंचन, आरोग्य, शिक्षण व कृषी क्षेत्रातील विकासासाठी योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(४५) ११७३७९ (२०-०७-२०१८). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.नारायण पाटील (करमाळा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.शिरीषदादा चौधरी**

**(अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे कार्य अधिक सक्षमपणे करण्याची गरज लक्षात घेऊन शासनाने या मंडळांना पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करुन द्यावे यासाठी नियोजन विभागाने कालबद्द कार्यक्रम आखावा असे निदेश मा.राज्यपालांनी शासनास दि.२३ एप्रिल, २०१८ रोजी विदर्भ विकास मंडळ, मराठवाडा विकास मंडळ आणि उर्वरित महाराष्ट्र मंडळ यांच्या संयुक्त बैठकीत दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तिन्हीही वैधानिक विकास मंडळाने सिंचन, आरोग्य, शिक्षण व कृषी क्षेत्रातील विकासासाठी योजनांची अंमलबजावणी करावी असेही मा.राज्यपालांनी निदेश दिले असून उक्त तिन्हीही वैधानिक विकास मंडळांनी केलेल्या सुचनांचा अभ्यास व समन्वयासाठी एक समिती शासनाने नियुक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भ विकास मंडळ, मराठवाडा विकास मंडळ आणि उर्वरित महाराष्ट्र मंडळ या तिन्हीही वैधानिक विकास मंडळाने सिंचन, आरोग्य, शिक्षण व कृषी क्षेत्रातील विकासासाठी योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-०८-२०१८) :** (१) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाच्या दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजी आयोजित संयुक्त बैठकीमध्ये या विकास मंडळांवरील सदस्य सचिव व इतर पदावर आवश्यक कौशल्य असणाऱ्या अधिकाऱ्यांची निश्चित कालावधीकरिता नियुक्ती करण्यासाठी व्यवहार्य कार्यपद्धती निश्चित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(२) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळानी केलेल्या सुचनांचा अभ्यास व समन्वयासाठी समिती नियुक्त करण्याचा कोणताही प्रस्ताव शासनाचे विचाराधीन नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सजावटीच्या इको-फेंडली सामानावरील वस्तु व सेवा कर रद्द करण्याबाबत

**(४६) ११७९५५ (२०-०७-२०१८). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने थर्माकॉल आणि प्लास्टिक मुक्त महाराष्ट्र करण्याचा चांगला निर्णय घेतला असून राज्यातील गणेशोत्सवाच्या काळात सजावटीच्या इको-फेंडली सामानवरील वस्तु व सेवा कर रद्द करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधीनी मा. वित्त्तमंत्री यांच्याकडे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात जीएसटी कौन्सिलकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, जीएसटी कौन्सिलकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०८-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) सदर मुद्द्यावर सुट देण्याबद्दल मा.वित्त मंत्री भारत सरकार यांना शिफारस केली आहे.

(३) वरीलप्रमाणे.

---

**केंद्र सरकारने वस्तू व सेवाकर रद्द करण्याबाबत**

**(४७) १२०९७८ (२०-०७-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारने वस्तू व सेवाकर लावल्यामुळे मधुमेह, हदयरोग, कर्करोगावरील रामबाण औषधांसह प्रभावी प्रतिजैविकांच्या किंमतीत ३.४ टक्क्यांनी वाढ करण्यात आल्याने सर्वसामान्य रुग्णांना आर्थिक भुर्दंड पडून त्यांना लागणा-या नियमीत औषधांचा खर्च सुमारे ३ ते ४ हजार पर्यंत येणार आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर आजारांवरील औषधांच्या किंमतीत वस्तू व सेवा कर रदद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

वस्तू व सेवा कर कायद्याच्या अंमलबजावणीपूर्वी मधुमेह, ह्रदयरोग, कर्करोगावरील औषधे व प्रतिजैविकावर एक्साइज ड्युटी ६%, मुल्यवर्धीत कर ६%, लाईफ सेविंग ड्रग्ज ०% व काही ठिकाणी जकात कर ३% असे एकूण १२% ते १५% कर आकारणी होत होती. परंतू वस्तू व सेवा कर कायद्यान्वये उपरोक्त रोगांवरील औषधांवर हाच कर ५% ते १२% पर्यंत आकारला जात आहे. म्हणजेच संपूर्ण देशपातळीवरील विविध राज्यांच्या कर रचनेचा सारासार विचार करता उपरोक्त औषधांवरील कर वाढलेला नाही असे दिसून येते.

(२) लागू नाही.

(३) लागू नाही.

---

**औरंगाबाद जिल्हयात सिंमेट व स्टील मध्ये भाववाढ झाल्याबाबत**

**(४८) १२१५७७ (२०-०७-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात सिंमेट व स्टीलचे भाववाढ झाल्याने बांधकाम उद्योगावर परिणाम झाला असून नागरीकांना घर घेणे परवडत नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिमेंट व स्टील यांचे वाढत असलेले भाव रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०८-२०१८) :** (१) व (२) जीवनावश्यक वस्तू वगळता इतर वस्तूंच्या किंमतीवर सर्वसाधारणपणे राज्य शासन नियंत्रण करीत नाही. वस्तूच्या उपलब्धता व मागणीवर वस्तूचा बाजारभाव ठरत असतो. शासनामार्फत किंमतीबाबत हस्तक्षेप करण्यात येत नाही.

(३) लागू नाही.

---

**गडहिंग्लज, चंदगड व आजरा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पाणंद रस्ते/शेतरस्ते तयार करण्याबाबत**

**(४९) १२३०३५ (२३-०७-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पाणंद रस्त्याच्या प्रश्नाबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन प्रत्येक गावात पाणंद/शेतरस्ते तयार करण्याचा प्रकल्प शासनाने मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडहिंग्लज, चंदगड व आजरा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील गावांमध्ये पाणंद रस्ते/शेतरस्ते तात्काळ तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२४-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) आजरा तालुक्यामध्ये रोहयो अंतर्गत पाणंद रस्ते घेणेबाबत संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या २ पाणंद रस्त्यांचे प्रस्ताव छाननी व तांत्रिक मंजूरीसाठी संबंधित विभागाकडे सादर करणेत आले आहेत. तसेच लोकसहभागातून ७ पाणंद रस्ते खुले करणेत आलेले आहेत.

गडहिंग्लज तालुक्यामध्ये नरेवाडी ग्रामपंचायतीकडून ७ पाणंद रस्त्यांची मागणी करण्यात आली असता स्थानिक शेतक-यांच्या विरोधामुळे सदरची कार्यवाही पूर्ण करता आलेली नाही. याबाबत ग्रामपंचायत स्तरावर समिती नेमणेत येवून सर्व लगतधारक शेतक-यांच्या संमती पत्रासह फेर प्रस्ताव सादर करण्यात यावा असे संबंधितांना सूचित करण्यात आले आहे. परंतु अद्याप प्रस्ताव प्राप्त झालेले नसल्यामुळे पूर्ण झालेल्या कामांची संख्या निरंक आहे.

चंदगड तालुक्यामध्ये मौजे डुक्करवाडी गावचा अर्ज प्राप्त झाला आहे पण त्यासोबत पाणंद रस्त्याबाबत आवश्यक ती कागदपत्रे नसल्यामुळे ग्रामपंचायत कार्यालयाला सदर कागदपत्रांची पूर्तता करुन अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) तालुक्यात धडक सिंचन विहिरीच्या रक्कमेत झालेला गैरव्यवहार**

**(५०) १२५६८५ (२३-०७-२०१८). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनगाव सुर्ज (जि.अमरावती) तालुक्यात धडक सिंचन विहिरीमध्ये अनेक शेतकऱ्याच्या विहिरीच्या बांधकामामध्ये असमतोल रक्कम प्रदान करण्यात आली त्यामध्ये श्री देविदास संपतराव गिर्हे यांना ५,४५८ रु.(कमी रक्कम प्रदान केली), श्रीमती लीलाबाई रामदास गिर्हे यांना २,७७२ रु (कमी रक्कम प्रदान केली), सौ अर्चना राजेश पवार यांना ४,०२० रु (कमी रक्कम प्रदान केली), यशवंत वर्धुजी मदने यांना ६७६ रु.(कमी रक्कम प्रदान केली), अरुण जिवलग लोणारे यांना १,२७८ रु (कमी रक्कम प्रदान केली) भाग्यश्री सतीश सरोदे यांना २५,६३९ रु (अतिरिक्त रक्कम प्रदान केली), विष्णू गोविंद पडोळे यांना १,४९,२४० रु.(अतिरिक्त रक्कम प्रदान केली) याप्रकारे लाभ देताना शेतकर्यांना कमी जास्त रक्कम देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार असमतोल रक्कम काढणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यासह धडक सिंचन विहिरीमध्ये शेतकऱ्यांना त्यांच्या विहिरीच्या बांधकामातील असमतोल रक्कम प्रदान करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१८-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे. प्राथमीक चौकशीमध्ये प्रस्तुत प्रकरणी धडक विहिरींच्या मुल्यांकनामध्ये कमी/जास्त रक्कम प्रदान केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी सखोल चौकशी आवश्यक ठरत असल्यामुळे जिल्हा परिषद स्तरावरून सखोल फेरचौकशी करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. फेरचौकशी अंती नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.